# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन
२०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./१७५१ /२०२५ दि. १५/१०/२०२५

## परिपत्रक

विषय:- संलग्नित महाविद्यालयांमध्ये एच.आय.व्ही./एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालय तिथे आरआरसी उपक्रमांतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करणेबाबत.

संदर्भ:- सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र.:मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/४६४९-८१ दि. १६/०९/२०२५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे मा. विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, नॅको, नवी दिल्ली यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात तरुणांमध्ये दरवर्षी हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रुग्ण सापडत आहेत. यावर उपाययोजना म्हणून विद्यापीठाअंतर्गत असलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) मध्ये रेड रिबन क्लबच्या उपक्रमांचा समावेश करावा. तसेच ज्या महाविद्यालयात एनएसएस नाही त्या महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक एड्स दिन तसेच वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करण्यात यावी. जेणेकरुन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये सदर आजाराबद्दल संपुर्ण माहिती होईल. एचआयव्ही/एड्स आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरीता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नविन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरीता महाविद्यालय तिथे रेड रिबन क्लब स्थापन करणे व जनजागृती करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

करीता सोबत संलग्नित पत्राचे अवलोकन करुन महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लब स्थापन करुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करावे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

( श्री. दिनेश नरोटे )
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य / विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी:-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ........ दि. ........
जावक क्र. 8276 दि. 29/9/25

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई-०१.

जा.क्र: मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/4649-81 दिनांक-१६ / ०९/२०२५

प्रति,

१) मा. अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) मा. अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) मा. सचिव वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

५) जिल्हाधिकारी, (सर्व)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 2024 दिनांक 30.9.25
जावक क्र. ........ दिनांक ........

**विषयः महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये एच.आय.व्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालय तिथे आरआरसी उपक्रमांतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबत.**

महोदय,

एड्सवर पूर्णत्वाने मात करणे करीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांच्या दरम्यान आलेल्या अनुभवावरुन एनएसीपी V चा कालावधी (सन २०२१-२०२६) अर्थात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा पाचवा टप्पा तयार करण्यात आला आहे. कार्यक्रमाची रचना, त्याची उद्दिष्टे, अंमलबजावणीचे प्राधान्यक्रम आदी सर्व गोष्टी ठरवितांना विविध स्तरावर व्यापक प्रमाणात सल्लामसलत करण्यात आली आहे. वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींच्या संघटना, संशोधक, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सर्वांबरोबर सर्वसमावेशक असा हा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

नॅको, नवी दिल्ली यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये प्रौढ (१५ ते ४९) वयाच्या लोकांमध्ये एचआयव्ही चा प्रदुर्भाव हा ०.२९% इतका आहे. तसेच एचआयव्ही/एड्स बद्दल व्यापक ज्ञान असलेले तरुण (१५ ते २४ वर्षे) यांचे प्रमाण फक्त ३७% इतके आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४) वर्ष एचआयव्हीचा भार १८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४ वर्षे) दरवर्षी हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रुग्ण सापडत आहेत. युवक

युवतीमध्ये एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्करण्याची/बिनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांच्यामध्ये संसर्ग होण्याची शक्यता इतरापेक्षा अधिक असते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मराएनिसं) द्वारे रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनीपर्यंत एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यात येते. महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैंगिक वर्तन अधिक जबाबदार बनविणे, रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये सन २०१० पासून आतापर्यंत १३२ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये महाविद्यालयीन युवकांचा सहभाग असतो. रेड रिबन क्लब मार्फत त्यांच्या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये (एनएसएस) एच१आयव्ही/एड्स जनजागृतीकरिता विशेष प्राधान्य दिले तर एनएसएसद्वारे आयोजित उपक्रमामध्ये आणि कॅम्पच्या ठिकाणी त्यांच्याद्वारे व्यापक व प्रभावी जनजागृती होईल.

जागतिक एड्स दिन (०१ डिसेंबर) रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयात एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीचे कार्यक्रम होतात. परंतु फक्त जागतिक एड्स दिनाच्या कार्यक्रमापर्यंत मर्यादित न राहता, मराएनिसंकडून आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट) व राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) साजरा करुन युवांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथे असलेल्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष (डापकू) यांचे मार्फत महाविद्यालयात जाऊन संवेदीकरण करण्यात येते.

आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व विद्यापीठ व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) मध्ये रेड रिबन क्लबच्या उपक्रमांचा समावेश करावा. तसेच ज्या महाविद्यालयात एनएसएस नाही त्या महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक एड्स दिन तसेच वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करण्यात यावी. जेणेकरुन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये एचआयव्ही/एड्स, गुप्तरोग / प्रजनन मार्गातील संसर्ग (STI/RTI) हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिबंध कसा करावा याबद्दल संपूर्ण माहिती होईल.

एचआयव्ही/एड्स आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरिता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नवीन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरिता महाविद्यालय तिथे रेड रिबन क्लब स्थापन करण्यासाठी आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ. निपुण विनायक
सचिव - १
सार्वजनिक आरोग्य विभाग